**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मुंबईत दाखल, उद्या रिझर्व्ह बँकेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार

- केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना उद्यापासून Unified Pension Scheme चा पर्याय निवडण्याची मुभा

- अणुकार्यक्रमाविषयी चर्चा करण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रस्ताव इराणने नाकारला

**आणि**

- एप्रिल ते जून हा कालावधी यंदा नेहमीपेक्षा जास्त उष्ण राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाकडून व्यक्त

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आल्या आहेत. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. उद्या त्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९० व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या समारोप समारंभाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना उद्यापासून UPS-Unified Pension Scheme अर्थात एकीकृत निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय उपलब्ध होणार आहे. NPS अर्थात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे सदस्य असलेल्या कर्मचाऱ्यांना ३ महिन्यात NPS किंवा UPS यापैकी एक पर्याय निवडायचा आहे. UPS ची वैशिष्ट्यं The Pension Fund Regulatory and Development Authority नं नुकतीच जारी केली आहेत. १ एप्रिल २००४ नंतर केंद्र सरकारच्या सेवेत रुजू झालेल्या

२३ लाख कर्मचाऱ्यांना यासाठी ऑनलाइन नोंदणी करता येईल. यात किमान २५ वर्ष सरकारी सेवा केलेल्यांना शेवटच्या वर्षभराच्या मूळ वेतनाच्या सरासरीच्या किमान ५० टक्के इतके निवृत्ती वेतन मिळेल. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबाला निवृत्ती वेतनाच्या ६० टक्के इतकी रक्कम मिळेल. किमान १० वर्ष सेवा झालेल्यांना UPS अंतर्गत किमान १० हजार रुपये निवृत्ती वेतनाची हमी देण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय आजपर्यंत निवडायचा होता. त्यांना आता वर्षभराची मुदतवाढ सरकारनं दिली आहे.

<><><><><>

APM अर्थात जुन्या खाणीतून मिळणाऱ्या नैसर्गिक वायूची किंमत उद्यापासून ४ टक्क्यांनी वाढवायला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. यामुळं सीएनजी, पीएनजी महाग होण्याची शक्यता आहे.

साडे ६ डॉलर MMBtu वरुन हा दर पावणे ७ डॉलर MMBtu झाला आहे. दोन वर्षात पहिल्यांदाच ही दरवाढ झाली आहे. केंद्रीय मंत्री मंडळानं एप्रिल २०२३ मध्येच याला मंजुरी दिली होती.

<><><><><>

अंमली पदार्थ तस्करीविरोधी पथक आणि दिल्ली पोलिसांनी एका टोळीकडून २७ कोटी रुपयांहून जास्त किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी पाच जणांना अटक केली आहे. याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पथकाचं कौतुक केलं आहे.

<><><><><>

पंजाबमध्ये तरनतारन इथं अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एकाला पंजाब पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून १५ किलो हेरॉईन जप्त केलं आहे.

आरोपी पाकिस्तान आणि अमेरिकेतल्या अंमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित आहे.

<><><><><>

मणिपूरमधल्या संघर्षाला अंमली पदार्थ, घुसखोरी, आणि जंगलतोड अशी विविध कारणं असल्याचं मणिपूरचे माजी मुख्यमंत्री एन बीरेन सिंग यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमावर लिहीलेल्या पोस्टमधे त्यांनी म्हटलंय की, मणिपूरच्या समस्यांचं राजकीय भांडवल केलं जाऊ नये. मणिपूरनं आतापर्यंत खूप भोगलंय आणि मणिपूरच्या बाहेरच्या व्यक्तींनी त्यासंदर्भात ढवळाढवळ करु नये. गेल्या महिन्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा केल्यानंतर बीरेन सिंग यांनी पदाचा राजीनामा दिला. मे २०२३ पासून मणिपूरमधे झालेल्या संघर्षात अडीचशेहून जास्त जणांचा बळी गेला आहे.

<><><><><>

वफ्क सुधारणा विधेयक संसदेत सादर झाल्यावर त्यावरच्या चर्चेत सहभाग घेण्याचं आवाहन केंद्रीय अल्पसंख्यक व्यवहार मंत्री किरेन रिजीजू यांनी सर्व राजकीय पक्षांना केलं आहे. नवीदिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या विधेयकाविषयी काही राजकीय नेते अफवा पसरवत आहेत. नागरिकांची दिशाभूल करण्याचे हे प्रयत्न निंदनीय असल्याचं ते म्हणाले. संयुक्त संसदीय समितीत या विधेयकावर सविस्तर चर्चा झाली आहे. या समितीनं विविध संघटना आणि नागरिकांची या विधेयकाबद्दलची प्रतिक्रिया जाणून घेतल्याचं रिजीजू यांनी सांगितलं.

<><><><><>

इराणच्या अणुकार्यक्रमाविषयी चर्चा करण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रस्ताव इराणनं नाकारला आहे. ट्रम्प यांनी २०१८ मधे अणुकराराविषयीच्या चर्चेतून माघार घेतल्यानंतर ही चर्चा पुढे सरकू शकली नाही. ट्रम्प यांनी इराणवर

नव्यानं निर्बंध लादणार असल्याचं सांगितलं आहे. इराणवर लष्करी कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. तर इराण प्रत्येक हल्ल्या चोख उत्तर देईल, असं इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खोमेनी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

युक्रेनमधे शांतता प्रस्थापित करण्याच्या शक्य त्या पर्यायांवर अमेरिका आणि रशिया काम करत असल्याचं रशियानं म्हटलं आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्सकी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर आपण रागावलो असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं होतं. त्यानंतर रशियानं हे निवेदन दिलं आहे. मात्र दरम्यान रशियानं युक्रेनशी युद्ध सुरुच ठेवलं असून खारकिववर सलग दुसऱ्या रात्री हल्ले केले.

दुसरीकडे स्वीडनच्या सरकारनं युक्रेनला बाराशे कोटी पौंड इतक्या किंमतीची नवीन लष्करी मदत जाहीर केली आहे. युक्रेनला अधिक कंपन्यांची मदत मिळावी, यादृष्टीनं संरक्षण निर्यातीसाठी निर्यातहमीही सुरु करणार असल्याचं स्वीडनचे संरक्षण मंत्री पाल जॉन्सन यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतात यंदा एप्रिल ते जून हा कालावधी नेहमीपेक्षा जास्त उष्ण राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. हवामानशास्त्रविभागाचे प्रमुख मृत्युंजय मोहपात्रा यांनी ही माहिती दिली. देशाच्या मध्य, पूर्व आणि वायव्य भागात या काळात सहसा ४ ते ७ उष्णतेच्या लाटा येतात. यंदा त्यांची संख्या दुप्पट होण्याची शक्यता असून केवळ तुरळक ठिकाणचे अपवाद वगळता तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरयाणा, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओदिशा, छत्तीसगढ, तेलंगण आणि आंध्रप्रदेश या राज्यांमधे, तसंच कर्नाटक आणि तमिळनाडूच्या उत्तर भागात ही

स्थिती राहील. या काळात वाढलेल्या उष्म्यामुळे विजेची मागणी देखील ९ ते १० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.

<><><><><>

आयपीएलमध्ये आज मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा डाव चांगलाच घसरला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा कोलकाताच्या आठ षटकात ५ बाद ५९ धावा झाल्या होत्या. दीपक चहरनं २ गडी बाद केले. कोलकत्याचा एकही खेळाडू ३० पेक्षा जास्त धावा करू शकलेला नाही. मुंबईत वानखेडे मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात मुंबईनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता.

<><><><><>

मुंबई होणाऱ्या वेव्ह परिषदेच्या दरम्यान वेव्हज बाजाराचही आयोजन केलं जाणार आहे. यात चित्रपट, टीव्ही, Animation, VFX, Gaming, and Comics यासारख्या क्षेत्रातले दिग्गज एकत्र येणार आहेत. यात भागिदारी, व्यवसाय विस्तार यासारख्या गोष्टींवर चर्चा होईल. त्यासाठी प्रक्षेपण व्यवस्था, खरेदीदार - विक्रेते यांच्यात बैठकी, आंतर-देशीय भागिदारी वगैरेसाठी व्यवस्था उपलब्ध असेल. www.wavesbazaar.com या वेबसाइटवर याविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे.

<><><><><>

आकाशवाणी मुंबई प्रादेशिक वृत्त विभागाच्या संचालक सरस्वती कुवळेकर आज सेवानिवृत्त झाल्या. भारतीय माहिती सेवेतल्या ३४ वर्षात त्यांनी फिल्म प्रभाग, नवी दिल्ली तसंच मुंबईत दूरदर्शन आणि नागपूर तसंच मुंबई आकाशवाणीच्या वृत्त विभागात काम केलं आहे.

<><><><><>

भुकंपामुळे जीवितहानी झाल्यानं म्यानमारमधे एक आठवड्याचा दुखवटा जाहीर झाला आहे. ३१ मार्च ते ६ एप्रिल या कालावधी राष्ट्रीय दुखवटा पाळला जाईल. या काळात मॅनमारचा राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल. मॅनमारमधे बचावकार्य सुरू असून आंतरराष्ट्रीय स्तरावर मदत मागितली जात आहे. भारत, रशिया, संयुक्त अरब अमिराती आणि संयुक्त राष्ट्रांनी बचावासाठी पथकं पाठवली आहेत. संयुक्त राष्ट्रांनी जगातल्या देशांकडे ८ दशलक्ष डॉलरची मदत मागितली आहे.

म्यानमारमधे भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी गेलेले भारतीय पथकं काल मंडाले इथं पोहोचले असून वैद्यकीय आणि इतर मदत पोहोचवण्यासाठी काम करत आहेत. मंडाले आणि यंगूनला अधिकची मदत पोहोचत असल्याचं यंगूनमधल्या भारतीय दुतावासाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. या भूकंपात दोन हजारपेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले असून ३ हजार ९०० जण जखमी झाले आहेत.

<><><><><>

फ्रान्सच्या न्यायालयाने नॅशनल रॅली पक्षाच्या नेत्या मरीन ले पेन यांना पाच वर्षांसाठी निवडणूक न लढवण्याची तसंच तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. २०२७ च्या अध्यक्षपदाच्या लढतीतल्या त्या प्रमुख उमेदवार आहेत. पेन यांनी त्यांच्या पक्षाच्या सदस्यांना पैसे देण्यासाठी युरोपियन संसदेच्या निधीतल्या ३३ लाख डॉलर्सपेक्षाही जास्त रक्कम वापरल्याचा आरोप आहे. पेन यांच्याशिवाय या प्रकरणात आठ जण दोषी आढळले आहेत. त्यामुळे नॅशनल रॅली पक्षाला २० लाख १६ हजार डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला आहे.

//<><><><><>//